| | |
|---|---|
| **MHND260004062019** | कौ. हि.स्त्री. सं. का. अर्ज क्र.१९/२०१९<br>सौ. कल्पना वि. नारायण+१ |

निशानी क्र. ११ वर आदेश

सदरचा अर्ज हा अर्जदार यांनी महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदा २००५ च्या कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदरचा अर्ज हा शपथपत्रासोबत दाखल केला आहे.

२. अर्जदारानी अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ हि गैरअर्जदाराची कायदेशीर लग्नाची पत्नी असुन त्यांचे लग्न दिनांक २८/०३/२०१३ रोजी झाले व लग्नानंतर ती गैरअर्जदार यांच्या घरी नांदण्यासाठी गेली. तिथे तिला गैरअर्जदार यांनी ब-याचदा शारिरीक व मानसिक छळ केला. त्याबाबत तिने मुख्य अर्जात ब-याच गोष्टी नमुद केलेल्या आहेत व गैरअर्जदार यांनी दिलेल्या त्रासामुळे अर्जदार हि माहेरी राहत आहे. त्यामुळे ती स्वतःचा सांभाळ करु शकत नाही. अर्जदार हिला गैरअर्जदार क्र. १ पासुन गजानन नावाचा एक पाच वर्षाचा मुलगा आहे. त्यामुळे गैरअर्जदार याने अर्जदार हिला उदरनिर्वाहासाठी दरमहा पाच हजार रुपये अंतरिम पोटगी दयावी अशी विनंती केली आहे.

३. गैरअर्जदार क्र. १ हा आचारी म्हणुन काम करतो. त्यास पंधरा हजार रुपयाचे उत्पन मिळते असे कथन केले असुन त्यास बारा हजार रुपये मिळत असल्याबाबत गजानन बार ॲण्ड रेस्टॉरंट यांची दिनांक ११/०८/२०२२ रोजीची मुळ प्रत प्रकरणात दाखल केली आहे.

४. गैरअर्जदार हे प्रकरणात दाखल होवुन त्यांनी त्याचा लेखी म्हणणे मांडलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा एकतफी चालविण्यात येतो.

५. माझ्या मते कोणतीही विवाहित स्त्री विनाकारण माहेरी राहणार नाही. तसेच जरी ती माहेरी राहिली तरी तिचे व तिच्या मुलाबाळांचे पालनपोषणे करणे ही गैरअर्जदार याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. परंतु त्याने आजपर्यंत अर्जदारांना कधीही खावटी खर्च म्हणुन पैसे पाठवलेले नाही. अशा परिस्थीतीत माझ्या मते गैरर्जदार याने अर्जदारांचा स्वतःहुन सांभाळ करण्यास नकार दिला आहे असे माझे मत आहे. त्यामुळे अर्जदार हे खावटी मिळण्यास पात्र ठरतात. गैरअर्जदार क्र. २ हिच्या नावाने घर असुन कर भरल्याची मुळ पावती प्रकरणात दाखल आहे. म्हणुन अर्जदार करिता रक्कम रुपये ४,५००/- अंतरिम पोटगी माझ्या मते योग्य

राहिल व ती तो सहज देवु शकतो. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

आदेश

१. अर्जदार हिचा अर्ज अशंतःमंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये ४,५००/- सदर  अर्ज दाखल केल्यापासुन अंतरिम पोटगी म्हणुन दयावा.

Digitally signed by MANGESH DAYARAM BIRHARI
Date: 2023.03.21 15:56:48 +0530

ठिकाणः- अर्धापुर.
दिनांक २०/०३/२०२३

(एम.डी. बिरहारी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र. ०१, अर्धापुर.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| नाव | | ए. व्ही. शहाणे. (क.लिपीक) |
| न्यायालयाचे नाव | | दिवाणी न्यायालय क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. श्रेणी, कोर्ट क्रमांक ०१, अर्धापुर. |
| दिनांक | | २०.०३.२०२३ |
| पिठासीन अधिकारी यांनी न्यायनिर्णय /आदेश वर केलेली स्वाक्षरी | | २०.०३.२०२३ |
| न्यायनिर्णय /आदेश अपलोड केलेली तारीख | | २१.०३.२०२३ |

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS